**Price Rs.: 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल), पुणे

ह्यांची गृहपत्रिका

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा द्वेषाचा लवलेश नसावा*

*सादासी प्रतिसाद मिळावा वाद नको संवाद असावा*

वर्ष चौथे अंक चौथा मे २००७ (May - 2007)

## संपादकीय

**प्रिय वाचकहो, सप्रेम नमस्कार**

मध्यंतरी 'सकाळ' मध्ये आमच्या वाचनात एक 'ग्राफिटी' आली ती अशी -''आपण तरूण आहोत असा मनात विचार येत असेल तर तुम्ही नक्कीच म्हातारे झाला आहात.'' हल्ली सुविचार कोठल्यातरी एका कोपऱ्यात असतात आणि ग्राफिटी मात्र मोठ्या अक्षरात झळकतात. पेपरमधील अशा काही ग्राफिटी अथवा बातम्या मनाला नाऊमेद करतात. म्हातारपण म्हटले की, चेहऱ्यावर सुरकुत्या, गालफडे बसलेली, खोकला दम्याने बेजार, अजागळ अवतार असे चित्र मनापुढे येते आणि आता पुढे माझे कसे होणार या विचाराने मन बेचैन होते.

ह्या उलट तारुण्य म्हणजे आनंद, उत्साह, मौज, मजा, हास्य, प्रेम, सौंदर्य, शक्ती, बेफिकीर वृत्ती, कसलाही ताण नाही हे सर्व गुण आठवायला लागतात आणि हेच तारुण्य आणि आरोग्य आयुष्याच्या शेवटपर्यंत रहावे असेच सर्वांना वाटते.

नियमित व्यायाम, प्राणायाम, योग्य आहार, विहार व सर्वात महत्त्वाचे म्हणजे नैतिक आचरण यामुळे आरोग्य उत्तम राहील व हाच तारुण्य लांबविण्यावर उपाय आहे. जसे तुम्ही विचार करता, तसेच होता. आता जरा जोरात हसा. अजून जोरात हसा Laughter is the best Medicine. सर्व रोगांवर एकच उपाय. हासण्यामुळे शरीरातील प्रत्येक पेशीला प्राणवायूचा पुरवठा होतो. निरोगी राहण्यावर हा एकच उपाय आहे.

आता वयोमर्यादा वाढली असल्याने '२०-ते ४० तारूण्य व एकदा का डोळ्याला चाळीशी आली की, म्हातारपणाची सुरवात' ही व्याख्या आपण आता बदलायला हवी. हल्ली ७५-८० पर्यंत मनुष्य तरूणच असतो. साठीनंतर त्याच्या तारूण्याला घुमारे फुटायला लागतात. रतन टाटांसारखे वयाच्या ८५ व्या वर्षी विमान चालवितात. कोणी Ph.D. करतात, कोणी ज्योतिषाचा अभ्यास करतात. अगदी आपल्याला डोळ्यासमोरचे उदाहरण पाहिजे असेल तर पेन्शनर्स असोसिएशन मधील सर्वश्री दांडेकर, गोखले व इतर कित्येक मंडळींचे उदाहरण देता येईल. ह्यातील एकही जण म्हातारा नाही. साठीनंतर ह्या म्हातारपणाला हरविणे हा सुद्धा आपल्या जीवनातील एक पराक्रमच आहे. परमेश्वर कधी म्हातारा झालेला आहे असा फोटो आमच्या पाहण्यात अजून तरी आलेला नाही. श्रीकृष्ण, राम अशा अनेक दैवतांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले फोटो पाहून कोणासही आनंद होतो. आपला देव जर तरूण आहे तर आपणही तरूणच आहोत. आपण आनंदी राहण्याचा, तरूण आहोत असा सतत विचार केला तर वार्धक्य म्हातारपण आपल्यापासून दूर पळून जाईल. अहो, आनंदी राहण्यासाठीच तर परमेश्वराने आपल्याला जन्म दिलेला आहे.

घरात एकदा लग्नाचा किंवा आनंदाचा प्रसंग आला की, प्रत्येकात एक वेगळी शक्ती येते. ज्येष्ठ लोक मोठमोठी कामे पार पाडतात. ह्या उलट एखादा वाईट प्रसंग घरात घडला तर सर्वांच्याच अंगातील शक्ती जाते. सर्व जण गळाठून जातात ह्याचाच अर्थ ''हा खेळ भावनांचा''. आनंदाच्या प्रसंगी तुमच्या अंगात उत्पन्न झालेली शक्ती हे सुद्धा तारूण्याचेच द्योतक आहे. बायका सहसा आपले वय सांगत नाहीत. सतत मी तरूणच आहे हीच भावना त्या मनांत धरून ठेवतात. त्यांची रहाणी, सौंदर्यदृष्टी, बोलण्याची वागण्याची पद्धत, सतत तारूण्याच्याच विचाराकडे झुकलेली असते. म्हणूनच त्या असलेल्या वयापेक्षा नेहमी अधिक तरुण दिसतात. आयुष्यात जीवनावर झालेले संस्कार, चांगल्या सवयी ह्याचा परिणाम शरीरावर नक्कीच दिसून येतो.

तेव्हा ज्येष्ठांनो, आपण तरूणच आहोत असंच सतत मनाला बजावीत रहा. आपण म्हातारे झालो हा विचारच मनातून काढून टाका. ''तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार'' हा वामनराव पै ह्यांचा विचार मनात ठसवा. 'सकाळ' मधील वर दिलेल्या 'ग्राफिटी' मुळे नाउमेद न होता, उलट तुम्ही सतत तारूण्याच्या विचारात रहा. नक्कीच तुम्ही तरूण दिसू लागाल. तेव्हा मित्रहो, आपण सारे तरूण आहोत हे विसरू नका.

**- शरद शिंगवेकर**

## On Federation Front

**Our members would be happy to note that atleast after a lapse of over 5 years, the case filed by our seven senior citizen members from Delhi, with the support of Federation had come up for hearing on 26th April 2007. The Delhi High Court, however, wanted all the parties to the dispute to file synopsis of their affidavit, counter-affidavit etc., to the Court supported by certain papers. As no party has filed synopsis, the case is adjourned for 26th July 2007 and will be heard continuously.**

**- Secretary**

## Attention "Exit-option" Retirees

A meeting of "Exit-option" retirees of our Bank was convened by Shri. Sunil C. Mone, C.A. (son of Late Shri.C.D.Mone, pensioner of the Bank), on 11th May 2007 at Bharat Sadan Trust, Dadar (E), Mumbai which was attended by about 225 retirees. The meeting was addressed by Shri.Sunil Mone, Chartered Accountant, who has dealt the matter successfully in getting exemption under Section 10 (10)(C) of Income Tax Act to the R.B.I. retirees under its "O.E.R.Scheme". Shri.Mone streesed the need to come together by retirees of SBI under "Exit-option" scheme under the banner "S.B.I.Exit Optees' Association ( All categories)" and seek the exemption under the section 10(10)(C) of Income-Tax Act from the Mumbai High Court directly and not through Income Tax Department. For this, the convener of the above meeting has requested all those retirees under Bank's 'Exit-option' scheme, who want to join the group to fight the legal battle under the guidance of Shri.Mone, CA, who will plead the case in Mumbai High court. A Joining fee of Rs.1,000/- plus Rs.250/- as petition charges will have to be contributed initially by the retiree. **Our 'Exit-optee' members, who are desirous to join the above group, may personally contact Shri.Mone directly on his following address** for further details and the course of action to be initiated by him in the matter, well before 30thJune 2007. The above meeting was specially attended by S/Shri.B.G.Dandekar and S.B.Gokhale of the Federation.

Address : Shri.Sunil C. Mone, 205, Shanti Kunj, Dawood Baug Road, Andheri (W), Mumbai-400058. (Phone Nos. (020)26777196 / 26777314).

**- Secretary**

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune
## Panaji (Goa) Sub-Centre

Proceedings of the 9th Annual General Meeting held at Panaji on 25th March 2007

The 9th Annual General Meeting of Panaji Zonal Sub-Centre covering Goa, Sindhudurg & Ratnagiri Districts, was held at Staff Learning Centre, Panaji (Goa) on 25th March 2007 at 9.30 a.m. Around 160 members including Associate members and Family Pensioners/special invitees attended the meeting.

The dignitaries who were present for the meeting include Shri.Anil L.Shevade, AGM, SLC,Panaji; Zonal Sub-Centre office bearers - S/Shri.V.D.Kulkarni, Vice-President, I.H.Dias, Secretary, K.V.Gopinathan, Treasurer, Circle representatives S/Shri.R.N.Lalingkar, Secretary & L.G.Gandhi, Treasurer; M.D.Palkar from Pune and B.A.Daini from Kolhapur and Dr.A.B.Bandodkar, Bank's Sr.Medical Officer, Panaji Module,

Shri.A.L.Shevade, AGM, SLC(Panaji), extended a warm welcome to the dignitaries, special invitees and all the members present for the AGM.

Smt.Vijayalaxmi Menon, Dy.General Manager, Panaji Module inaugurated the meeting by lighting the traditional lamp.

One minute silence was observed to condole the death of the following members who passed away and whose names were reported to the Sub-Centre during the last year.

1) Smt.Shama V.Prabhu 12.12.2006
2) Shri.P.P.Mulgaonkar 02.01.2007
3) Smt.Alva R.Costa 22.01.2007
4) Shri.Jose S.G.Pimenta 10.11.2006
5) Shri.L.A.D.Fernandes 07-01-2007 (former Regional Manager of Goa branches)

Shri.V.D.Kulkarni, Vice-President, welcomed the Chief Guest, special invitees and all the members/family pensioners and tabled the Annual Report of the Panaji Zonal Sub-Centre for 2006-2007 before the house and highlighted the following points:-

a) Eversince the Panaji Zonal Sub-Centre was started on 28th March 1999, the growth of membership is continued and the total membership as on 25-03-2007 is 558 including Associate members & Family Pensioners, which has been appreciated by all the Circle Managing Committee of the Association in its meetings.

b) The Sub-Centre is organising regular monthly meetings of the local members in different areas such as - premises of branches at Panaji, ADB,Mapuca and Margao on 12th, 23rd and 10th of every month at fixed timings i.e. at 3.30 p.m., 4.30 p.m. and 10.30 a.m. respectively. The attendance at these meetings was encouraging. During these meetings the members were apprised of the latest developments regarding our demands of revision in pension/family pension etc.

b) The members who retired as 'I.B.I.' pensioners were helped in getting the amount of Rs.5000/- each, as per Bank's Circular issued in July 2006 for disposal of the amounts lying in E.P.F.Forfeiture Account. Some of them gave donations to the Association. So far, the Sub-Centre has received donations worth Rs.14,138/- during the last year.

c) The medical facilities to the pensioners of the Bank are being rendered satisfactorily by the Senior Medical Officer. Both the dispensaries, i.e. at Panaji and Margao, are also working to the satisfaction of the members.

d) Shri.V.D.Kulkarni is regularly delivering lectures on the subject -'Activities after retirement' and conducting 'Yoga Sessions' during the special programme "Planning for Retirement" conducted at SLC, Panaji.

e) Our members are helping the local Branch Managers in recovering 'NPAs' who are being reimbursed the out of pocket expenses for the services rendered by the members.

Shri.V.D.Kulkarni also told the members that the office-bearers of the Zonal Sub-Centre are planning to visit Kudal, Ratnagiri and Chiplun shortly to meet the local members and apprise of the latest developments taking place on

Federation front and also to enroll new members. Thereafter, Shri.V.D.Kulkarni requested Shri.Hipolito Cabral to compere the meeting as per the Agenda.

Our senior member Shri.Joseph Luis Fernandes was felicitated on his attaining 75 years of age at the hands of Chief Guest by offering him a bouquet & a shawl. On this occasion Shri.Fernandes thanked the Association for the felicitation. He also told that he learned three important things whilst in service i.e. Honesty, Discipline and adherence to the Book of Instructions of the Bank.

The Zonal Sub-Centre felicitated Shri.P.G.Kakodkar, former Chairman of the Bank and former President of Panaji Zonal Sub-Centre, on his receiving the prestigious “C.D.Deshmukh” Award last year. As a token of love, a brass lamp was presented to him at the hands of Smt.Vijayalaxmi Menon, DGM, who was the Chief Guest of the function. In reply to the felicitation Shri.Kakodkar thanked the Association members for the love expressed by them and also expressed concerns regarding unduly long pending pension related issues.

Dr. A.B.Bandodkar, Bank’s Sr. Medical Officer, gave a very informative and useful talk on “How to avoid Heart Attack” with the help of power-point presentation. This was appreciated by all.

Shri.R.N.Lalingkar, Secretary of the Circle Association, informed the members about our Association’s web-site “www.sbipensionerspune.org” which contents useful information including latest news about our Federation’s efforts to resolve pension related issues as also latest issues of “SAMVAD” which are made available on web-site by 25th of each month. He requested the members to make use of this facility. He also requested for contributions by way of articles etc. for publication in ‘SAMVAD’. He also suggested to all the members to keep with them the xerox copies of their pension sanction letters along with calculation sheets for future references. This will be useful when the revision of pension will take place in near future. It will enable them to furnish the necessary salary particulars required to be filled in the proposal for sanction by the Bank.

Smt.Vijayalaxmi Menon, DGM and Chief Guest, conveyed great satisfaction that this AGM, as in the past witnessed by her, was packed to capacity in the Hall. She appreciated the good work being done by the Association in helping the Bank for NPA recoveries etc. through its members. She said that there is lot of scope for the retired Bank’s employees in areas like setting up of NGOs for economic activities, to give Bank their expertise on credit opinions etc. She further told that she has made efforts to extend further medical facilities such as tie-up with Manipal Hospital, which is already approved for reimbursement of medical bills. Arrangements for such tie-ups are under negotiation with Victor Hospital also. She requested the pensioners to come forth with more suggestions for any more help that the DGM can extend.

Smt.Menon also expressed concern at the apprehension that the lead status of SBI is falling in Goa due to Corporate transformation that the Bank is presently undergoing at all India network - which is having its teething problems initially. But, in the long run, victory will be ours in quantum leaps. Other Banks are taking advantage of today’s temporary turmoil. She requested assistance from the Pensioners to counsel its customers/clienteles. She appreciated the monthly meetings of the pensioners at the identified Branches.

In his address Shri.V.M.Gokhale, Circle Present, appreciated the advice of the DGM for the pensioners to create ‘Self-Help-Groups’ for economic activities. He gave examples of such SHGs already functioning in Maharashtra as a result of encouragement given by the former CGM Shri.Ramesh Kumar. While taking stock of the situation, he highlighted the present impasse regarding our demand for 50% pension. Inspite of our active support to their strike in April 2006, both the working staff/officers Federations have ignored our advice of consulting us before final

negotiations with the Govt. while withdrawing the strike. Even there was no 'MoU' in writing, as being claimed by them. So, our Federation has taken a conscious decision to file legal suits in different High courts for different issues. Federation has also sought support from Shri.E.K.Thakur, M.P. (Rajya Sabha) in putting up joint memorandum to the Finance minister/Prime Minister, signed by more than 100 MPs, to resolve our long outstanding issues.

Shri.S.B.Gokhale, Federation General Secretary, narrated in detail what has happened after withdrawal of Strike on 9th April 2006 on Federation front. He also explained why Govt. permission is necessary whenever any financial benefit is required to be passed on to pensioners by Bank. It is a statutory requirement as per S.B.I Act to safe guard interest of the employees when there were no Staff/Officers' Unions/Associations to take care of interest of employees. But this provision in the Act has become a tool in the hands of Govt. authorities to deny our just demands for some reason or the other. So, we have demanded the change in the Act. Shri.Gokhale further told that our Federation has also sought improvement in SBI Retired Emp.Medical Benefit Scheme by suggesting inclusion of additional diceases as also eligibility criteria as per earlier Scheme-I. He also referred to the arrangements proposed at B.K.Joshi Trust Hospital at Ratnagiri and requested the DGM, Panaji Z.O. to consider the proposal at the earliest.

In the open forum, Shri.M.B.Bhat, pensioner from Margaon, raised a point of establishment of Bank's Dispensary at Margaon. He was assured that the Dispensary has already been set-up and a Doctor has also been appointed.

While concluding the meeting with a 'Vote of thanks' to all, Shri.I.H.Dias, Secretary of Panaji ZSC appreciated the lucid way of compering the meeting by Shri.Cabral. The meeting ended with singing of National Anthem. Thereafter a delicious lunch was served to all.

***- I.H.Dias***, Secretary

## दृष्टिदान

*(डोळ्यांचे ऑपरेशन नंतर जग कसे दिसेल हे आदल्या दिवशी मनातल्या मनांत चित्र रंगवणाऱ्या नेत्र रूग्णाचे मनोगत. सत्य घटनेवर आधारित.)*

उद्याची सकाळ
उजाडती असेल
अंधारातून प्रकाशाकडे
वाटचाल होणार आहे ॥१॥
स्पर्श, गंध, श्वासाने
आस्वादलेले जग
प्रत्यक्षात दिसणार आहे
'चक्षुर्वैसत्यम्'
मलाही म्हणता येणार आहे ॥२॥
कसे असेल जग ?
नाजूक साजूक
सुंदर, सुमधुर
जसे टागोरांना दिसले ॥३॥
की
बुद्धांनी पाहिले तसे
दुःख दारिद्र्य
यातनांनी व्यापलेले ॥४॥

***- नी.व.ओढेकर, नासिक***

## सोहळा

सारला पदर अंधाराचा
उमलत्या मोहक सृष्टीचा
लालिमा चढला लज्जेचा
चौघडा वाजला पक्ष्यांचा
रम्य रवीच्या स्वागताचा
वर्णू कसा हा सोहळा ? ॥१॥
नेसला शालू हरिताचा
फळा फुलांच्या वेलबुट्टीचा
साज केला चैतन्याचा
खुलला आनंद समृद्धीचा
अपूर्व रवीच्या मीलनाचा
वूर्ण कसा हा सोहळा ? ॥२॥
दाटला अंधार अंतरीचा
काळोख आणि सावल्यांचा
नि:श्वास मिटल्या पाकळ्यांचा
भरला गंध रातराणीचा
रवी अवनीच्या वियोगाचा
वर्णू कसा हा सोहळा ? ॥३॥

***- सौ.स्नेहल तऱ्हाळकर, अकोला***

## मैत्री-सेंट्रल ऑफिसशी

स्टेट बँकेत नोकरी आणि त्यात सेंट्रल ऑफिसमध्ये काम करणे म्हणजे आमच्या स्टाफची कॉलर नेहमीच ताठ असे. १९५५ ते १९६५ पर्यंत म्हणजे सेंट्रल ऑफिस मुंबई मेन ब्रँच मध्येच असेपर्यंतचा काळ आमच्या सर्वांच्या दृष्टीने मंतरलेला होता.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जुन्या इंपिरियल बँकेचे स्टेट बँक ऑफ इंडियात नामांतर झाले. भारत सरकारचे नियंत्रक म्हणून एखाद्या आय.ए.एस. अधिकाऱ्याची अथवा एम.पी. पुढाऱ्याची भारत सरकार नेमणूक करीत असे.

श्री. बी. पी. पटेल आय. ए. एस. ह्यांच्या नंतर पुण्याचे श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. श्री काकासाहेब त्या आधी पंजाबचे गर्व्हनर होते. बँकेचे नामांतरानंतर पहिली काही वर्षे कामकाज इंपिरियल बँकेच्या प्रथेप्रमाणे होत असे.

पुण्याहून मिटींगसाठी येतांना काकासाहेब सरदार गृहात उतरत. त्यावेळी श्री व्ही. एन. चंदावरकर हे चेअरमन ऑफ बोर्ड ऑफ डायरेक्टर होते. टाटा कंपनीतील वरिष्ठ अधिकारी नेव्हील वाडिया, गोदरेज, वालचंद हिराचंद वगैरे बडी मंडळी डायरेक्टर बोर्डावर होती. एक पुण्याचा महाराष्टीयन म्हणून मला काकासाहेब गाडगीळांचा अभिमान होता.

काकासाहेब म्हणजे त्यावेळी महाराष्ट्राचे लाडके दैवतच होते. त्यांचे 'आज म्या सिंह पाहिला' हा 'केसरी'त आलेला लेख मला अजून आठवतो. पंजाबचे राज्यपाल असतांना त्यांचे अनुभव त्यांनी त्यांच्या एका पुस्तकात नमूद केले आहेत.

काकासाहेबांच्या दिमतीला असलेला हेड मेसेंजर म्हात्रे मला कधी कधी काकासाहेबांकडे भेटीला घेवून जात असे. काकासाहेब माझ्याशी अगदी मनमोकळ्या गप्पा मारीत असत ते गंमतीने म्हणायचे कीं, 'आम्ही आधी मंत्री होतो, नंतर पंजाबचे गव्हर्नर झालो आणि आता बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर झालो.', खरे पाहता हा मान धनंजयराव गाडगीळ ह्या अर्थतज्ज्ञाला मिळायला पाहिजे होता. परंतु त्यांच्या ऐवजी मला मिळाला त्याचे कारणही त्या सर्वेसर्वा पंडित नेहरूंची इच्छा. काकासाहेबांना मेन ब्रँच कॅन्टीनमधील बटाटे वडे फार आवडत.

त्यावेळी एस.एस. पंडित साहेब बँकेचे सेक्रेटरी व टेझरर होते. त्यावेळेत अनाजी दळवी पंडित साहेबांचा हवालदार होता.

निरनिराळ्या ब्रँचचे एजंट किंवा इतर साहेब पंडित साहेबांना भेटायला येत तेव्हा, या अनाजी दळवीची मर्जी त्यांना संभाळावी लागे. त्याचा रूबाबच वेगळा होता. हा रिटायर झाल्यावर काकासाहेबाच्या दिमतीस असणारा श्री. म्हात्रे हवालदार प्रमोशनला ड्यू होता. परंतु त्याच्या पेक्षा एका ज्यूनियर माणसाला प्रमोशन द्यायचे घाटत होते. म्हात्रेवर हा अन्याय होता. ही गोष्ट स्टाफ युनियनने काकासाहेबांच्या कानावर घातली. अर्थात काकासाहेबामुळे म्हात्रेला हे प्रमोशन मिळाले.

ह्या मंतरलेल्या काळातील अनेक गोष्टी आहेत. बँकेत बँक कर्मचाऱ्यांना घर बांधण्यासाठी बिनव्याजी कर्ज देण्याचे जाहीर केले तेव्हा आपल्या पेन्शनर असोसिएशनचे सध्याचे अध्यक्ष श्री. दांडेकर ह्यांच्या पुढाकाराने आम्ही पहिली हौसिंग सोसायटी सांताक्रुज मुंबई येथे बांधली त्यावेळी चेअरमन भट्टाचार्य व मॅनेजिंग डायरेक्टर बी.जी. पटेल हे आले होते. त्यांच्या नावाचा बोर्ड आमच्या सोसायटीत अजून आहे. हा मंतरलेला काळ आठवतो आणि जणू काही सर्व काही क्षणापूर्वीच घडले आहे असे भासते.

**प्र. वा. केळकर,**
**अे१/१०१ 'करिष्मा' सोसायटी,**
**कर्वे रोड, कोथरूड-पुणे-४११०२९**

## पोळा आहे आज

राऊत नांवाचा अत्यंत व्रात्य-खोडकर मुलगा आमच्या प्री-डीग्रीच्या वर्गात होता. वर्गात अगदी शेवटच्या बाकावर तो बसत असे आणि तिथूनच लेक्चर चालू असता, निरनिराळे आवाज काढत-खोड्या काढत वर्गाचे लक्ष वेधून घेत असे..... विचित्र-असंबद्ध प्रश्न विचारत असे. ''असं का ?'' ''अरे वा ऽ'' ''अग बाई'' अशा प्रकारचे शेरे मारत तो सर्व वर्गाला हसवत राही.

आमचे मराठीचे प्रोफेसर डॉ. बाळासाहेब दातार माडखोलकरांच्या ''दोन ध्रुवावर'' या रॅपीट रिडींगच्या पुस्तकावर लेक्चर देत होते. निश्किल नर्म विनोद खमंग उदाहरणे देत त्यांचा पिरिअड चालू होता.

राऊतचे नेहमी प्रमाणे खोड्या-रिमार्क चालू होते. आपल्या खोड्यांनी वर्गात गंमत करून हंसवणे हा एकमेव उद्देश त्याचा होता.

राऊतला शिकण्यात कांही गम्य नव्हतेच. तो एकदम उभा राहिला.

''काय हंवयं ?'' प्रोफेसरांनी विचारले.

''शंका !!'' राउत म्हणाला.

''विचारा कसली शंका'' प्रोफेसर.

करंगळी उंचावत राउत म्हणाला-''म्हणजे...... लघु शंका आहे.''

सर्व वर्ग मागे वळून बघत होता. हास्य कल्लोळ उडाला त्याच्या उत्तरामुळे.

''लवकर जा....तंगडी कुठे भलतीकडे उचलू नका- निघा'' प्रोफेसरांनी त्याला बाहेर जाण्याची परवानगी देत म्हटले- वर्गात पुन्हा हास्य कल्लोळ झाला. नाचत-बागडत ''गुबु गुबु'' म्हणत राउत बाहेर भर वर्गातून गेला.... वर्ग शांत झाल्यावर प्रोफेसर मिश्किलपणे म्हणाले...'' छाऽऽ न !'' कसा नाचत-बागडत गेला... जाऊ द्या ! आज त्यांचाच सण आहे...... पोळा आहे ना आज !!''

क्षणांत सर्व वर्ग पुन्हा हास्य कल्लोळात बुडाला.

**- श्री.मधु रानडे**
**११ स्टेट बँक कॉलनी वडाळारोड, नाशिक**

# Severing of the umbilical cord

Prakash had his own ideas, views and opinions, much different from his schoolmates and later on colleagues in the college, right from the age of ten.

To him, they all seemed to be concerned only about material things such as studies, games, movies, cineactors, and girl students and like things. Heroism, sacrifice and valour by the national heroes and freedom fighters, lives of Vivekananda, Aurobindo and of great philosophers and saints who never cared for the material pleasures of life had deep influence on him. This was to some extent the influence he had of the biographies of the great men and of the stories he had read.

Prakash was intelligent, had a good academic record and a good personality too. On graduation he got a well-paid job as an executive in a very reputed concern. Two years following that he got married. Prakash was now totally immersed in the pleasures of the married life and the material benefits the handsome job brought. In the next six years, he had two lovely children, a son and a daughter. This brought fullness to his life.

Being part of the children from the time they opened eyes to have first look at the outside world and their day to day wonderful growth : babe in arm, toddler, school going child, adulthood and later on settling in life-in job and in marriage.

Prakash just could not believe himself, that the children could occupy his life so much : the fatherly affection and duty, care and concern, joy and pleasure, the childish pranks and activities, sports and friends of the children had become an inseparable part of his life. It was of course, a fortunate thing that at no stage Prakash had any cause to worry about the children.

Life at the office was fast and absorbing. Growth in size and finances of the company, the successful going up the promotional ladder by Prakash, a very sociable wife and life was full of joy and pleasure for Prakash.

Prakash's son who was brilliant at studies joined one of his friends as partner in a software company. The son was intelligent, hardworking and loved a high style living: good expensive clothes, well furnished house, moving out in a good car etc. The son's venture of not taking a regular job but joining a friend as a business partner paid indeed well for the first two or three years. He got married to a really good girl – it was a love marriage. The daughter who was really good looking and smart got married (through an arranged marriage) to a boy who hailed from a family financially much better from Prakash's. The son-in-law had his own establishment as an interior designer. Prakash could not believe his good luck: before two years of his retirement his children had got well settled in life.

The children were busy, naturally so, in their own lives. A change had started taking place in Prakash's life or more correctly in Prakash's thinking. This started a few months before his retirement. Increasingly and with growing restlessness, Prakash had started feeling that life was just not for the material things and for seeking material pleasures. The old Prakash of the adolescent days was taking over him.

He will distance himself with determination and resolution from the material pleasures, happiness or sorrow. As a first step he will start living a life of seclusion. He will keep bare minimum contacts with son, daughter, wife and friends. He will go for walks or to a picture house or even to a club all alone. He will not invite his wife or friend or relative to join him. He will start being reflective and reclusive. Such a secluded approach, Prakash sincerely hoped, would surely lead him to the path to an enlightened order.

Next six months or so, Prakash had a smooth sailing in pursuit of the new path.

The friends and relatives noticed the changed Prakash but thought that it was a temporary phase possibly due to some domestic problem. Prakash now felt very sure that in the next few years he would be able to severe all the ties with his family members and the rest of the world. He will then lead a life of a recluse, not a religious hermit though, at a far off place amidst the calm serenity of the nature. What he will do in his new 'avatar' was not however yet clear to him. Yet he genuinely felt that solitude, meditation and the detachment from the worldly things will enable him to get what he was seeking.

A few more months and things started moving sharply and downward in the lives of son as also of daughter. The son who was very fond of good living, expensive

habits and a good house received a setback, in that the company was not doing well. In fact it was almost going into red. The sales had plummeted and the profit margin reduced due to severe competition and escalating input costs. Prakash had visited his son's place in Pune before retirement and next some months after the retirement. He could easily notice the deteriorated financial position of the son. The car was gone, and in its place was a two-wheeler. The old furniture, the son had plans to replace was still there. The walls badly needed a fresh coat of paint. Because of his expensive style, the son and his wife had bought a number of expensive gadgets on installment basis. The son now found paying of the installments a difficult proposition. The son assured him that the things were improving but will take some more time. But there was not force in what he said.

On return from Pune, Prakash felt very restless, to see the sorry state of son's affairs. Prakash decided to do something to help his son tide over his problems. He could not just bear the unhappiness in his son's life.

He had been very lucky at capital market investments, namely, stock market and mutual funds scheme. In his new 'avatar' he had totally stopped even reading about capital markets. Now with a view to helping his son, he now again started taking interest at capital market, daily reading the financial newspapers and go for capital market investments, short term and long term. In his hey days at capital market investments, Prakash could make easily a profit of Rs. 15,000 to Rs. 20,000 per month, Fortunately, for Prakash the market conditions were very favorable now and he could remit Rs. 15,000 to Rs. 20,000 per month to his son. Praksh told that this was the annuity installment of the insurance policy he had taken for the benefit of the son. A total lie, though an innocuous one, just to make the son happy.

Two years for the daughter's marriage, Prakash and his wife could notice the cracks developing in her marriage. Initially, not of a serious nature, but slowly the rift between the two was assuming serious proportions. Initially Prakash did not take interest in them at all, his wife was handling the issue well. However, when there was talk of divorce Prakash stepped in fully and completely. For next two to three months, Prakash was busy bringing the son-in law and the daughter together, meeting the son-in-law's parents and even taking the son in law and the daughter to his friend who was a successful lawyer at the family court. At times, Prakash felt very disturbed that his involvement and efforts were proving of no avail. However his honest and convincing persuasion finally brought the warring couple together. He assured his son-in-law as also the daughter that he would be always willing and ready to help them when necessary.

Prakash could have easily remained away from the son's financial problems and the marital discord in the life of the daughter. To his surprise his wife was comparatively detached and composed. However the truth was that Prakash could not bear at any stage, sad and worried look on the face of son or daughter. He had always seen them happy and merry and he just could not bear the thought that there were problems and difficulties and resultant sorrows in their lives. Prakash was involved in the children literally and emotionally right from the time they stepped into the world. The love, affection, duty and concern that bound him, the father, to the children, was too strong to break away from them. The umbilical cord, which has to be severed to bring the child into the outside world, is a necessary act but the cord that binds the father to the children is through an evolutionary and a natural process of love and duty. Prakash realized, though he was unwilling to accept, that the links with the children cannot be severed and this part of the material world, he cannot relinquish. It will be futile and unsuccessful on his part to do so. He should accept this truth and adjust his life of reclusion accordingly. This change comforted Prakash. Reflecting more on the life of the recluse and the links, which had evolved over the years, Prakash realized, that friends and relatives have been with him a joy and sorrow, and in pain and pleasure. He cannot and should not severe these links in an abrupt and artificial way. He will have to strike a balance between the involvement in material life and a reflective and reclusive order, which he was seeking. Prakash now, almost for the first time, felt a true sense of inward peace and happiness.

**Sudhakar Chandurkar**
"Bakul", Flat No.307, New M-1.G.Colony,
Bandra (East) Mumbai - 400051.

# ''प्रेमाचे नाते''

''संध्या........ संध्या अगं आटपलं की नाही तुझं ? अगं नऊ वाजले. तुझी आज ऑफिसमध्ये महत्त्वाची मिटिंग आहे ना ? आणि हे बघ मला सुद्धा आज इन्स्पेक्शनला झोनल ऑफिसला जायचं आहे. तेव्हा तूं आज रिक्षा करून जा. मला तुला आज ऑफिसला सोडता येणार नाही !'' प्रकाश संध्याचा नवरा एवढी बडबड करत होता. पण ही नुसती हो..... हो..... आटपलंच ह्या पलिकडे त्याच्याकडे पहातसुद्धा नव्हती. तिच्या डोक्यात ऑफिसची मिटिंग आणि डायरेक्टर घोळत होते.

''संध्या अगं साडेनऊ वाजले !''

''हो आटपलंच.''

असं म्हणून तिने दोघा मुलांच्या पाठीवर शाळेची दप्तरं चढवून तीसुद्धा त्यांच्या बरोबरच घराबाहेर पडली. कॉलनीच्या गेटवर शाळेच्या बस करता त्यांना सोडून ती रिक्षा करत बाहेर पडली. एक-दोन थांबवण्याचा प्रयत्न केला पण सांताक्रूझ ऐकल्यावर सरळ निघून गेल्या. बरेच अंतर चालून आल्यावर एक रिक्षा मिळाली. हुश्श... करत ती रिक्षात बसली. घाम पुसत ती आजूबाजूला आणि घड्याळ बघत होती. काटा जसजसा पुढे सरकत होता तस तसा तिच्या काळजाचा ठोकासुद्धा वाढू लागला. बऱ्याच वेळाने तिला असे जाणवले ,रिक्षा, गाड्या भराभरा पुढे जात होत्या. शेवटी न राहवून तिने त्या रिक्षावाल्याला सांगितले,

''अहो जरा रिक्षा फास्ट चालवा नं. मागच्या रिक्षा पुढे जातात मला ऑफिसला वेळ होतोय.''

तेवढ्यात त्याने रिक्षा बाजूला घेतली आणि म्हणाला, ''उतरा वेळ होतो तर दुसऱ्या रिक्षाने जायचं. मी कांही बोलवलं नव्हतं.''

''सॉरी हं चुकलं. न्या, कशी पण न्या !'' असे म्हणून संध्या गप्प बसून हातावरच्या घड्याळात आणि अधून मधून इकडे तिकडे बघत होती. जेमतेम रिक्षा पार्ला स्टेशनजवळ आली. ट्रफिक जाम झाला होता. काय झालं काही कळायला मार्ग नव्हता. गाड्यांचे हॉर्न एवढे वाजत होते की हे असेच वाजत राहिले तर ह्या क्षणाला आपण बहिरे होणार की काय कोण जाणे. घड्याळात पाहिले तर संध्याच्या छातीत धस्स झाले. साडे दहा ! अकरा वाजता मिटिंग. तिला काही सुचत नव्हते. तेवढ्यात दोन्ही बाजूने शाळेच्या मुलांना घेवून दोन रिक्षा आल्या. हळूच त्यातील एक मुलगा तिला हात लावून 'मावशी' म्हणाला. ती नुसती हसली. तेवढ्यात दुसऱ्या बाजूच्या रिक्षामधल्या मुलाने तिचा हातच धरला आणि म्हणाला.

''मावशी मी तुमच्या रिक्षात येऊ ?''

झालं तेवढ्यात सध्याच्या रिक्षावाल्याने त्या मुलाचा हात झटकला आणि म्हणाला, ''ए गप्प बस.'' संध्याने, उगाचच काहीतरी बोलायचे म्हणून त्यांना विचारले, ''काय रे, आज शाळेला उशीर होणार ना ?''

''नाही कांही, आमचे हे रिक्षावाले काका आहेत ना ! ते फार चांगले आहेत. ह्या काकांसारखे आमच्या अंगावर ओरडत नाहीत, आणि आम्हाला किनई रोज एक-एक चॉकलेट देतात आणि असा ट्रफिक जाम झाला की गोष्ट सांगतात.'' तोपर्यंत संध्याची रिक्षा त्याने मुद्दाम पुढे नेली. तेवढ्यात मुलांची रिक्षासुद्धा तिच्या पाठोपाठ मावशी.....मावशी करत आली. ती काहीतरी बोलणार तेवढ्यात तिचा रिक्षावाला ओरडला, ''ए गप्प बसा कार्ट्यांनो. नाहीतर...'' असे म्हणत त्याने हात उगारला. तेवढ्यात संध्या म्हणाली, ''जाऊ द्या हो लहान आहेत.''

''जाऊ दे रे तुला नाही कळायचं मुलं फार गोड आहेत, मी रोज हेच काम करतो. त्यांना ने-आण करताना मला फार आनंद वाटतो. तेवढ्यात मुलं ओरडली, ''रिक्षावाले काका, मला आज चॉकलेट जास्त द्या. या मावशीला द्यायचं आहे !''

''बरं...बरं देईन हं ह्या मावशीला.''

संध्या विचार करू लागली किती फरक ह्या रिक्षावाल्याच्या बोलण्याचा आणि वागण्याचा! १५-२० मिनिटांत त्या मुलांनी पटकन् नातं जोडून आपलसं केलं. ती मुलांच्या विचारात एवढी रंगून गेली की आपल्याला ऑफिसला जायचं आहे हे ती साफ विसरून गेली. तोपर्यंत मुलांच्या रिक्षा फार पुढे गेल्या होत्या. तिला कालीन्याला जायचं होतं आणि मुलांनासुद्धा कालीन्यालाच जायचं होतं, हे त्यांच्या रिक्षावाल्याकडून कळलं. बस्स एवढंच. ह्या विचारात असताना तिची रिक्षासुद्धा त्या मुलांच्या रिक्षाबरोबर आली आणि मुलांनी पुन्हा गलका केला. मावशीची रिक्षा आली. मावशी....आली...आली.... संध्याने त्या मुलांना म्हटले, ''काय रे आज शाळेला उशीर होणार ना तुम्हाला ?''

''नाहीच मुळी, हे आमचे काका किनई कित्ती कित्ती चांगले आहेत. बाईंना सांगतील, का उशीर झाला तो !!''

''होय कां हो रिक्षावाले काका '' तिच्या तोंडून सहजच काका हा शब्द निघाला.

''ताई ही मुलं अनाथ आहेत. त्यातील दोन मुलं मंदबुद्धी आणि अपंग आहेत. ह्यांना एक वृद्ध श्रीमंत जोडपे सांभाळते. ते अंधेरीला राहतात आणि कालीन्याला एक बाई त्यांना थोडे फार शिकविते ती सुद्धा अनाथ आहे.'' रिक्षा हळूहळू चालताना ह्या गोष्टी चालल्या होत्या, आणि अचानक एक जोरदार धडक तिन्ही रिक्षा, एक स्कूटर यांना एका गाडीने दिली. काय होते हे कुणाला कळले नाही. एवढा ट्रफिक असताना ही गाडी एवढी जोरात वळण घेवून आदळली की सर्वच जण बाहेर फेकले गेलो. गाडी चालवणारा तर गाडीखालीच अडकला. मुलं मावशी....मावशी....काका....काका.... करत होती. सर्वांनाच जबरदस्त मार लागला होता. रिक्षावाल्यांनासुद्धा मार

बसला होता. त्यांना तर उठताच येत नव्हते. संध्याला डोळ्याला व हाताला लागले होते. यात तिची पर्स, ऑफिसची फाईल कुठे उडली ती कळलीच नाही. मुले तर तिला घट्ट धरून रडत होती. तिच्या कपाळाच्या व हाताच्या जखमेतून रक्त वाहत होते पण त्याकडे तिचे मुळीच लक्ष नव्हते. ती मुलांना शांत करत होती. रिक्षावाले मोठ्याने ओरडून ''ताई....ताई....ताई, मुलांना बघा.''

तेवढ्यात गर्दीतून दोन तरूण पुढे आले. इतर लोकांनी भराभर मदत करून सर्वांना बाहेर काढले. ते दोघे म्हणाले, ''ताई घाबरू नका आम्ही दोघे डॉक्टर आहोत. आम्ही यांना आणि तुम्हाला कूपर हॉस्पिटलात घेवून जातो. आम्ही सुद्धा तेथेच डॉक्टर आहोत.'' सर्वांना भराभर इलाज चालू केले. डॉक्टर, संध्याला ही मुलं कोण, कुठे राहतात ? फार माहीत नव्हतं. जेवढं रिक्षावाले काकांनी जे सांगितलं बस्सं तेवढंच. बरं त्यांच्याकडून नाव, पत्ता कळू शकलं असतं पण त्यांनाच खूप लागल्यामुळे औषध देऊन झोपवून ठेवलं होतं. संध्याने डॉक्टरांना विचारले, ''डॉक्टर ती मुलं कशी आहेत ?'' ''ती फार घाबरलेली आहेत. त्यांना किरकोळ मार लागला आहे. पण ती सारखं मावशी.... मावशी करताहेत. तुम्ही त्यांच्या मावशी आहात काय?'' ''नाही.....नाही. मी त्यांची कुणीच नाही. रस्त्यात आत्ताच ओळख झाली.'' रिक्षात बसल्यापासूनचं तिने सर्व सांगितले आणि तिला एकदम रडू आले. म्हणाली, ''डॉक्टर माझी पर्स, ऑफिसची फाईल कुठे आहे ? माझी आज मिटिंग होती. आता काय होणार कोण जाणे !तोपर्यंत घड्याळात आठ वाजले. डॉक्टर मला घरी जाऊ द्या. माझा नवरा, मुलं वाटत पहात असतील !

''आणि ह्या मुलांना कोण बघणार ?''

''मी सांगितलं ना, ती माझी कुणी लागत नाहीत !''

''व्वा ह्या अशा स्थितीत असहाय्य मुलांना टाकून तुम्ही तुमची मुलं बघता ? छान......''

डॉक्टरांच्या ह्या बोलण्याने संध्याने मान खाली घातली आणि डॉक्टरचे हात हातात घेत म्हणाली, ''डॉक्टर सॉरी पण माझ्या घरी फोन करून ह्यांना कळवा.'' तिने घरचा फोन नंबर सांगितला. तेवढ्यात सिस्टर एका माणसाला संध्याकडे घेवून आली. ती म्हणाली, ''हे तुम्हाला कुणी भेटायला आले आहेत.'' संध्याने त्याच्या हातातली आपली पर्स व फाईल पाहिली. ती आपली आहे ते पाहून ती म्हणाली, ''तुम्हाला कशी सापडली त्या गर्दीत आणि माझीच आहे हे कसं कळलं ?''

''ताई, तुमच्या रिक्षातून तुम्ही व ती मुलं सर्वच बाहेर फेकले गेलात तेव्हा ही पर्स माझ्या पायाजवळ पडली व हे कागद जरा इकडे तिकडे उडाले. मी भराभर गोळा केले. तुम्हाला सर्वांना कूपरमध्ये नेले एवढेच मी ऐकले आणि लगेचच इथे आलो. संध्याच्या हातात पर्स आणि फाईल देऊन तो माणूस तिच्या पायाला स्पर्श करून निघून गेला. हे चालू असता संध्याचा नवरा हॉस्पिटलमध्ये आला. त्याला पाहताच तिला आणखीनच रडू फुटले. संध्या व तिचा नवरा डॉक्टरना भेटून बाहेर पडले. मुलांना आपल्या बरोबर आपल्या घरी न्यायची परवानगी मागितली पण डॉक्टर तसे करण्यास तयार नव्हते.

दोन दिवसांनी रिक्षावाल्या काकांकडून त्या मुलांना सांभाळणाऱ्या वृद्ध जोडप्याचा व शिकवणाऱ्या बाईचा फोन व घरचा पत्ता घेवून त्यांना बोलावून घेतले. दोन दिवस मुलं दिसली नाहीत म्हणून खाण्यापिण्याला स्पर्श केला नाही. त्या मुलांना बघून त्या तिघांनी हंबरडाच फोडला. हॉस्पिटलच्या स्टाफला त्यांना आवरणं फार कठीण झालं. काय गोंधळ झाला म्हणून ती मागे वळली तसे डॉक्टरांनी तिची ओळख करून दिली. सर्वजण घरी गेले.

ह्या गोष्टीला बरेच महिने लोटले. संध्या आपल्या ऑफिसच्या, घरच्या कामात रंगून गेली. दिवाळी जवळ आली. दिवाळीच्या दिवशी भल्या पहाटे दारावरची बेल वाजली. संध्याने दरवाजा उघडला पहाते तो दारात सर्व मुलं आणि आजोबा आणि दोघे रिक्षावालेकाका हातात फुलांचे गुच्छ घेवून उभे होते. त्यांना पहाताच संध्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. मुलांनी तर मावशी....मावशी करून तिला मिठीच मारली आणि आजीने तर तिच्या तोंडावरून हात फिरवून आपल्या कानावर बोटे मोडली आणि म्हणाली, ''पोरी तुझ्यामुळेच माझी ही पोरं वाचली.'' तेवढ्यात रिक्षावाले म्हणाले, ''ताई आज रडायचे नाही. दिवाळी आहे आणि उद्या भाऊबीज आहे तेव्हा आम्ही दोघे रिक्षावाले काका...नाही...नाही विशाल आणि निनाद ओवाळून घ्यायला उद्या येणार आहोत. ती सर्व मंडळी गेल्यावर संध्या विचार करू लागली. कोण कुणाच्या जीवनात कसे येतात आणि आपलं हक्काचं 'नातच' लावतात. मावशी आणि ताई ह्या नात्याने तिला खरं प्रेम, माया पाह्यला मिळाली.

सगळेच रिक्षावाले सारखे नसतात, हे प्रत्येक वेळी रिक्षात बसताना आठवावयाचे व मन भरून यायचे आणि प्रत्येक भाऊबिजेला विशाल-निनाद ओवाळून घेण्याकरिता येत असत.

संध्याला प्रश्न पडला. रक्ताचं नातं खरं की हे खरं ? मात्र रक्ताच्या नात्याइतकेच हे निर्माण झालेलं नवं नातं अगदी चिवट आणि चिरकाल टिकणारं आहे याची या आगळ्या वेगळ्या अनुभवावरून संध्याला खात्री पटली.

***- सौ.इना तळपदे***

***'दर्शना' सी/१२, कल्याणी नगर-पुणे -४११००६***

e असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा – पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, अकोला

## 'संवाद' लेखस्पर्धा २००७ निकाल

आम्ही, जानेवारी २००७ च्या 'संवाद' च्या अंकात पुरुष सभासदांसाठी 'तुम्हां बायकांचे हे नेहमी असंच असतं' आणि स्त्री सभासदांसाठी 'मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे' या विषयांवर एक लेख स्पर्धा जाहीर केली होती. या स्पर्धेसाठी एकूण २८ सभासदांनी लेख पाठवले, त्या सभासदांची नावे -

१) श्रीमती शालिनी मुकुंद काशीकर, मुलुंड (पूर्व) २) सौ. सुचित्रा गोविंद साठे, ठाणे (प.) ३) सौ. ज्योती प्रकाश दुबे, अमरावती ४) श्री जनार्दन नरहर दातार, अमरावती ५) सौ. सुरेख हिरेन निरगुडकर, पुणे ६) श्री एस्.बी सटवे, नाशिक ७) श्री मधुकर गणेश रानडे, नाशिक ८) सुहासिनी हरी जोग, नागपूर ९) मंगला नातू, मुंबई १०) सौ. वीणा मुळे, अमरावती ११) श्री शशिकांत अनंत पराडकर, डोंबिवली १२) सौ. उर्मिला भालचंद्र गोरे, पुणे १३) श्रीमती निलिमा दि. कुलकर्णी, पुणे १४) श्रीमती शरयु अरविंद कुलकर्णी, कोल्हापूर १५) सौ. अरूणा मदन नगरकर, पुणे १६) सौ. साधना अजित धारवाडकर, डोंबिवली १७) सौ. स्वाती श्रीकांत क्षीरसागर, पुणे १८) श्री. दत्तात्रय रामचंद्र क्षीरसागर, पुणे. १९) श्री. पी. व्ही कुलकर्णी, सांताक्रुज (पूर्व) २०) श्री.मधुकर दिगंबर पालकर,पुणे २१) श्री.मुकुंद गोविंद सराफ, विलेपार्ले (पूर्व) २२) सौ. विद्या विनायक कुलकर्णी, कोल्हापूर २३) श्री. विनायक शंकर कुलकर्णी, कोल्हापूर २४) सौ. नीता चंद्रकांत कुलकर्णी, पुणे २५) श्री. पु नि. देशपांडे, अमरावती २६) श्री. गोविंद शंकर करमरकर, सांगली २७) श्री. माधव विठ्ठल नाडकर्णी , अंधेरी (प.) २८) सौ. ज्योती सूर्यकांत बागुल, बोरिवली (प.)

**स्पर्धेविषयी थोडसं मनोगत -**

या वर्षी 'संवाद लेख स्पर्धे 'चा विषय घरगुतीच, सर्वांच्या नेहमीच्या अनुभवातला, पण स्पर्धेसाठी तसा नवीनच म्हणून मुद्दाम निवडला होता. स्पर्धेसाठी एकूण २८ लेख आले. त्यातील महिला विभागात १६ तर पुरूष विभागात १२ लेख आले. महिला विभागातील लेखांचे परीक्षण करतांना, बऱ्याच लेखिकांनी अगदी बिनधास्तपणे, मोकळेपणाने आपले पती विषयीचे कटु अनुभव कथन करतांना, पतीच्या गुणांचा, चांगुलपणाचा, ओझरता उल्लेख करण्यास त्या विसरल्या नाहीत हे विशेष. काही लेखात स्वत:च्या ऐवजी दुसऱ्यांचे अनुभव कथन केले आहेत. पुरूष विभागात आलेल्या कांही लेखात एकच अनुभव फारच सविस्तर पणे मांडला आहे. किमान दोन, तीन अनुभव लेखात समाविष्ट झाले असते तर लेख अधिक उठावदार झाले असते. आलेल्या लेखांमध्ये एक गोष्ट विशेष खटकली ती म्हणजे, सभासद लेखकांनी, लेखिकांनी आपल्या लेखांमध्ये प्रसंगानुरूप झालेले संवाद एकाच ओळीत, एकापाठोपाठ लिहिलेले आढळले. प्रत्येक संवादाला वेगळी ओळ व एका खाली एक असे सादरीकरण आवश्यक आहे. त्यामुळे संवादातील नाट्य, विनोद, उपहास चटकन् लक्षांत येऊन, वाचनही सुलभ होते. पुरुष विभागातून आलेल्या लेखात मधूनमधून विनोदाचा शिडकावा अनुभवास मिळाला हेही एक विशेष.

या वर्षीच्या लेखस्पर्धेसाठी आलेल्या बऱ्याचशा लेखातील अक्षर खरोखरच सुंदर, वाचनीय होते. त्यामुळे संपादक मंडळाचे परीक्षणाचे काम बरेचसे सुकर झाले यांत शंका नाही. संपादक मंडळाने पारितोषिकांसाठी लेखकांची केलेली निवड खालील प्रमाणे -

**पुरुष विभाग :** विषय-'तुम्हां बायकांचे हे नेहमी असंच असतं '

**१) प्रथम क्रमांक-** रु.५००/- (रूपये पांचशे फक्त)
श्री. मुकुंद गोविंद सराफ, विलेपार्ले (पूर्व) मुंबई.

**२) द्वितीय क्रमांक -** रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त)
श्री. मधुकर दिगंबर पालकर, पुणे.

**३) तृतीय क्रमांक -** रु. २००/-(रुपये दोनशे फक्त) विभागून
(१) श्री. गोविंद शंकर करमरकर, सांगली.
(२) श्री.माधव विठ्ठल नाडकर्णी, अंधेरी (प.) मुंबई.

**महिला विभाग**: विषय- 'मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे'

**१) प्रथम क्रमांक -** रु. ५००/- (रुपये पांचशे फक्त)
सौ. ऊर्मिला भालचंद्र गोरे, पुणे.

**२) द्वितीय क्रमांक -** रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) विभागून
(१) सौ. सुरेख हिरेन निरगुडकर, पुणे.
(२) सौ. अरूणा मदन नगरकर, पुणे.

**३) तृतीय क्रमांक -** रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) विभागून
(१) सौ. सुचित्रा गोविंद साठे, ठाणे (प.).
(२) सौ. साधना अजित धारवाडकर, डोंबिवली. (प.).
(३) सौ. नीता चंद्रकांत कुलकर्णी, पुणे.

सर्व पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन ! पारितोषिक पात्र लेखांना 'संवाद' मध्ये क्रमश: प्रसिद्धी दिली जाईल. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्व साधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते देण्यात येतील. त्यांना पत्राने तसे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. स्पर्धा म्हटल्यावर काहींना आनंद, तर काहींचा विरस हे ओघाने आलेच. तरी पण ज्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांनी, नाऊमेद न होता, आपले लिखाण चालूच ठेवावे. ज्या स्त्री, पुरुष सभासदांनी 'संवाद' च्या लेख स्पर्धेत भाग घेतला त्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार.

- संपादक मंडळ : 'संवाद'

## 'संवाद' लेख स्पर्धा २००७
## पुरूष विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख
## तुम्हां बायकांचं नेहमी असंच असतं. !

असं म्हणतात की देवाने प्रथम चराचर सृष्टी निर्माण केली मग तिचा आनंद उपभोगण्यासाठी पुरुषाची निर्मिती केली. पण कदाचित् पुरुषाचं सुख त्याला पहावलं नसावं. म्हणून त्यानं स्त्री निर्माण केली. ती सुद्धा कशी माहितीय् ? पृथ्वीवर पाठवण्यापूर्वी तिला विचारलं, ''तुला सौंदर्य हवं की बुद्धी ? आणि आश्चर्य म्हणजे क्षणाचाही विलंब न करता ती म्हणाली, ''मला सौंदर्यच दे, सौंदर्याच्या बळावर बुद्धी विकत घेता येते.'' त्याचे परिणाम ''ज्ञात हे चराचरा'' किंवा ''घरा घरा'' या सदरात मोडणारे आहेत. बहुतांश विवाहितांचे अनुभवाचे बोल किंवा बोलके अनुभव आहेत. अपवाद ठरले ते फक्त भटजींनी 'शुभमंगल' म्हणताच वेळीच 'सावधान' होऊन बोहोल्यावरून पळ काढणारे समर्थ म्हणूनच 'नमस्कार माझा तया रामदासा.'

आज इतक्या वर्षांच्या सहजीवनानंतर मागे वळून पाहिलं तर वाटतं छत्तीस गुण जमूनही एकमेकांमध्ये छत्तीसचा आकडा का यावा ? बहुतेकांच्या वैवाहिक जीवनामध्ये 'सुखसंवाद', 'सुसंवाद', 'संवाद', 'वाद' आणि 'वितंडवाद' अशी उतरती भांजणी का असावी ? असं म्हणतात की व्याकरणात दोन नकारांचा एक होकार होतो. मग प्रत्यक्षात सौं च्या नकाराचा होकार होत नाही की होकाराचा नकार नाही असं का ? सुरवाती सुरवातीची बांगड्यांची सुमधुर किणकिण नंतर नंतर कर्णकटु 'किटकिट' कां व कशी वाटायला लागते ?

बरं ! असेल आपल्या बाबतीत हा अपवाद म्हणावं तर, 'घरोघरी तीच बोंब'. एकमेकांना बघण्याच्या कार्यक्रमाने सुरू झालेली वैवाहिक जीवनाची नांदी 'मी तुझ्यात काय बघितलं कुणास ठाऊक ? अशा संवादाने मध्यंतर घेते आणि भरत वाक्याबाबतीत मात्र बहुतेक नवऱ्यांमध्ये एकवाक्यता व्हायला हरकत नाही.

'स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत कालची माता असते' हे अत्र्यांचे सत्य मान्य केलं तरीही 'तिथे पहा' म्हणणाऱ्या समस्त नवऱ्यांना माझे आई म्हणायची वेळ कां यावी ? मग संस्कृत कवी व नाटककार भास याचं 'गृहिणी सचिव: सखी मिथ: प्रियशिष्या ललिते कलाविधौ ' वगैरे वर्णन भासच म्हणायचा कां ? खरंच बायकोचं मन हे एक कोडं आहे आणि कितीही डोकं चालवलं - अगदी 'सुडोकु' पेक्षा सुद्धा नवरा बायकोची जोडी जमवणाऱ्या ब्रह्मदेवालाही ते सुटेलसं वाटत नाही.

अगदी बुद्धिबळाचा (चालेल ना ?) आधार घेऊन सांगायचं तर 'उंट तिरका का चालतो ?' किंवा घोडा अडीच घरंच का चालतो ? या प्रश्नांना जसं उत्तर नाही, त्याचप्रमाणे माझ्या प्रत्येक शब्दाला, वाक्याला किंवा कृतीला नेमका अनपेक्षित अर्थ किंवा अनर्थ काढणारा प्रतिसाद का मिळतो ?

आता हेच बघाना ! आम्ही कुठल्यातरी लग्नाला निघालो होतो. सौ.नटून थटून तयार झाल्या. लग्नाला (अर्थात् आमच्या) इतकी वर्षे होऊनही मी न राहवून म्हणालो, 'आज तुझा चेहरा चंद्रासारखा छान दिसतोय् !'' माझं कांही चुकलं कां ? 'सरळ सांगा ना, माझ्या चेहऱ्यावर डाग आहेत !' तुम्हां बायकांचं नेहमी असंच असतं असं मी म्हटलं तर ?

चिरंजीवांचं लग्न झाल्यावरची गोष्ट. सुरवातीची हौस मौज, हिंडणं-फिरणं, करता करता चार सहा महिने गेले आणि नव्या सूनबाईंनी पहिल्यांदाच घरांत सबंध स्वयंपाक केला. खरोखरच सगळं छान झालं होतं. इतकं की पहिल्या घासालाच माझी दाद गेली 'शाबास सूनबाई ! सासूबाईंची गादी चालवणार' असं वाक्य पूर्ण करायच्या आत आमच्या या कडाडल्या. ''बायकोच्या हातचं खाऊन कंटाळलात - आतां सुनेचं कौतुक करा'' - ह्यावर काय बोलणार सांगा ! या बायकांचं नेहमी असंच असतं.

गेल्या जन्मीचं थोडं फार सुकृत असेल. एकदा एका नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचे पासेस मिळाले. सौं.नी अपेक्षित प्रश्न विचारला, 'कुठली साडी नेसू' ? 'अगं परवा तर नवी घेतली ना ?' 'अहो ती बहिणाबाईंनी पळवली.' आता बायकोच्या साड्या पळवण्या पलिकडे मेव्हण्यांचा आम्हाला काय उपयोग ?' असा प्रश्न तोंडावर आला होता. पण संभाव्य हल्ल्याची कल्पना येऊन मी 'मना सज्जना' ला आवर घातला.

आमच्या सौं.ना प्रमोशन मिळून फॉरेन एक्सचेंज ब्रँचला पोस्टिंग मिळालं. मी हरखून अभिनंदन केलं. 'अगं असं पोस्टिंग अलबती गलबतीला मिळत नाही.' 'मला अलबती गलबती म्हणतां ?' म्हणून ती फणकाऱ्यानं निघून गेली. त्या दिवशीचा पेढाही गोड लागेना.

अहो ! एकदा हिच्या वाढदिवसाला माझ्या एका चित्रकार मित्राकडून काढून घेतलेलं एक सुरेख चित्र हिला लॅमिनेट करून घेऊन प्रेझेंट दिलं ! म्हटलं खूप कौतुक होईल. ''हं आतां हे हॉलमधे लटकवा, आणि त्याला चंदनाच्या फुलांचा हार घाला म्हणजे सुटलांत !''

आता मुलांचं कौतुक आपणच करणार ना ? पण त्यांच्यातलं चांगलं ते तिचं आणि अपयशाचं पितृत्व माझ्याकडे हे माहित असूनही, कन्यकेनी बी.कॉम्.ला फर्स्ट क्लास विथ डिस्टिंक्शन मिळवल्यावर चुकून मी 'बघितलंस ! माझ्याकडून हुशारी घेतलीय् !' 'तरीच तुमच्याकडे श्री शिल्लक शून्य' सौंचा रिव्हर्स स्वीप !''

प्रवासात मग बसचा असो की रेल्वेचा, मला खिडकी आवडते, यांत कांही वावगं आहे कां ? पण यावरसुद्धा 'अजून हौस भागली नाही वाटतं ?' हा शेरा खरा मानावा, तर हिच्याबरोबर जातांना हिची एखादी मैत्रीण जात असते आणि प्रश्न येतो ''बघितलीत कां?'' हो म्हणावं तर ''वाटलंच मला. मेलं आजूबाजूलाच लक्ष.'' बरं नाही म्हणावं तर ''तुमचं लक्ष असतं कुठे हो ?'' इकडे बाऊन्सर सुटतो.

सौ.रायगड किल्ल्याजवळ एका ब्रँचला होत्या. महिन्याच्या पहिल्या दिवशी काम आवरता आवरेना व नेमकी कोजागिरी. रात्री ८ ला अकाऊंटंटची विनोदबुद्धी 'कोऽ जागर्ती' झाली 'अरे आज हिरकणी कोण होणार ? तिथे एक मराठी समजणारा पार्शी ऑफिसर होता. 'साहेब अशा समदा बुरूजच हाओ' समस्त स्त्री वर्गानी रसरसून दाद दिली. पण सौ.घरी आल्या. त्या सॉलिड चिडलेल्या होत्या. 'मेला समजतो काय स्वत:ला ?' आणि खरं सांगतो ऐन कोजागिरीच्या दिवशी घरांत अमावस्या होती. बायकांचं हे असंच असतं !

तर मित्रहो ! येथवरी आहे ऐसा हा प्रकार ! अहो ! शेवटी घरोघरी मातीच्या चुली, फार तर बर्शेन किंवा महानगर गॅस. फरक तपशिलाचा. नियतीला पण काय एकेक काष्ठ जमवायची सवय असते हेच कधी कधी समजत नाही. लग्नाच्या बोहोल्यालाच विवाहवेदी का म्हणतात, 'कायम आपला बळीचा बकरा व्हायचा असतो म्हणून कां ?'

पण कधी कधी विचार केला तर वाटतं हे असं आपल्याच बाबतीत आहे का ? की आपण एकाच बाजूने विचार करतो ? चंद्रावर एका बाजूला डाग आहे जो आपल्याला दिसतो म्हणून आपण दुसऱ्या बाजूला असेलच असं गृहीत नाही का धरत ? 'शोले' सारखं त्या नाण्याच्या दोन्ही बाजूला 'छाप' किंवा 'काटाच' असतो अगदी तस्सं !

मग तसं असतं तर ही सहजीवनाची इतकी वर्षे अशीच गेली का ? एकमेकांला समजून न घेता ? शेवटी संसार हा प्रेम व विश्वास या दोन चाकावरच उभा आहे. मग कर्णाच्या रथासारखं एक चाक जरी जमिनीत रूतलं तरी महाभारताचा शेवट नाही का होणार ? शेवटी सीतेने लक्ष्मणरेषा ओलांडली म्हणून तर रामायण घडलं ना ?

शेवटी एक क्षण भाळण्याचा बाकी सांभाळण्याचा हेच खरं !

**मुकुंद गोविंद सराफ**
विले पार्ले (पूर्व) मुंबई, दूरध्वनी २६१५०२४८

## स्त्री विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख
## "मी बघून ठेवलयं तुमचं हे नेहमीचचं आहे"

'संवाद-लेख स्पर्धा २००७ मधील स्त्री-सभासदांसाठी असलेला स्पर्धेचा विषय वाचला आणि बसमधील खिडकी जवळ बसण्याच्या प्रसंगात आलेले पत्नीचे उद्‌गार - 'मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचचं आहे !' हे वाचलं आणि क्षणभर वाटलं -आम्हा उभयतांना बघून तर हा विषय कोणी सुचवलेला नाही ? कारण बसचा १०/१२ मिनिटांचा प्रवास असो, की बाहेरगावी जाण्याचा मोठा १०/१२ तासांचा प्रवास असो, शक्य असेल तेव्हां पतिराज खिडकीजवळ बसणार - हे ठरूनच गेलयं ! हा एक छोटा प्रसंग, पण खरोखरीच या नवरे लोकांना 'तुमचं हे नेहमीचचं आहे' असे म्हणण्याची वेळ वारंवार येते.

समाजात नोकरी करणाऱ्या बायका व नोकरी न करणाऱ्या बायका असे दोन प्रकार अस्तित्वात असले तरी, घरातल्या जबाबदाऱ्यांच्या दृष्टीने पूर्ण वेळ गृहिणी व अर्ध्या वेळात पूर्ण गृहिणीची कामे करणारी स्त्री अशीच विभागणी दिसते.

घरांत पाहुणे येण्याचे प्रसंग असोत किंवा लग्नकार्य, वास्तुशांती, साठी, पंचाहत्तरी असे काही कार्यक्रम असोत - एकतर आम्हां बायकांना उत्साहच फार असतो आणि बहुतेक जणींना अधूनमधून नवऱ्यावर सोपवलेल्या अशा जबाबदारीचा जो अनुभव आलेला असतो, त्यावरून धावपळ झाली तरी चालेल, पण नंतर अचानकच वेगळ्याच प्रसंगांना सामोरे जाणे नको- असे होऊन जाते.

माझे पतीही वरील प्रकारच्या नवऱ्यांच्या प्रकारात मोडणारे! माझी स्टेट बँकेतील नोकरी ही 'प्रोग्रॅमर'ची असल्याने शाखांच्या संगणकीकरणासाठी किंवा इतरही काही निमित्ताने बरेचदा अचानक ठरून कामासाठी दौऱ्यावर जावे लागे. अशीच एकदा मी नाशिकला गेलेली असताना माझ्या मामीची पंचाहत्तरी तिच्या मुलासुनेनी ठरवली. मी बाहेरगावी असल्याने ह्यांना फोनवरच सांगितले, 'मामीला बेडशीट व सुनेला साडी द्या. मी कपाटात आणून ठेवलेली आहे.' बाजारात गेले की आवडतील त्या वस्तू घरांत प्रेझेंटस् म्हणून आणून ठेवायची मला सवयच आहे. हे म्हणाले, 'Don't Worry ! मी सर्व बरोबर करतो.' दोन दिवसांनी परत आल्यावर मी मामीला भेटायला गेले, तर ती म्हणाली, 'अगं कार्यक्रम छान झाला, पण तू अशी हिरवीगार जरीची साडी कशी काय मला दिलीस ? हे गेल्यापासून गेल्या ५ वर्षात मी पांढरा रंग सोडून कोणताही रंग वापरत नाही ! झालं ! सर्व प्रकार माझ्या लक्षात आला. घरी आल्यावर मी ह्यांना रागावूनच म्हटले, 'अहो, मामीला कसली हिरवीगार साडी दिलीत ? आणि सुनेला बेडशीट दिलेत ना ?' तर हे म्हणाले, 'अगं, मामीची एवढी पंचाहत्तरी, तेव्हा तिलाच चांगली साडी द्यायची असणार, असे मला वाटले. कामाच्या गडबडीत तू उलट सांगितलेस, म्हणून मी तुझी चूक rectify केली.' मी डोक्यालाच हात लावला, आणि म्हटलं, 'तुमचं हे नेहमीचंच आहे !'

तसाच अजून एक प्रसंग. माझ्या काकांचा मेकॅनिकल पार्टस्चा छोटा कारखाना आहे. त्यांचा एकुलता एक मुलगा इंजिनिअरींगला गेला. तो लवकरच आपल्या हाताशी येईल, अशी काकांना अपेक्षा होती. पण त्याचे काही शिक्षणात फारसे लक्ष नव्हते. इंजिनिअरींगला पहिल्याच वर्षी तो दोनदा नापास झाला. याचा शिक्षणाचा चार वर्षांचा कार्यक्रम नक्की कधी संपणार याचीच काकांना चिंता होती. असेच आम्ही सहज त्यांच्याकडे गेलो होतो. काकांचे मुलाशी काहीतरी बिनसले होते. त्यांचा एवढा मूडही नव्हता, पण एवढ्या बारीक गोष्टी यांच्या कुठल्या लक्षात यायला ? हे आपले काकांना म्हणायला लागले, 'काका, आता तुम्ही आराम करा. धंद्यातून बाहेर पडा. काकूंबरोबर मस्त परदेशची ट्रीप करून या. मुलगा आता हाताशी

आलाच आहे. तो आणखी नवेनवे प्रयोग करेल !' कधी फार न बोलणारे हे आता चुकीच्या वेळेस कशाला एवढे बोलताहेत, असे मला झाले. काहीतरी कारण सांगून मी लवकरच ह्यांच्यासह बाहेर पडले - हेच म्हणत, 'आत्ता अगदी काही अडलं होतं कां एवढं बोलायचं ? तुमचं हे नेहमीचंच आहे !'

तसेच मुलांच्या बाबतीत तर ही 'बाबा-मंडळी' इतकी अनाकलनीय वागतात की विचारूच नका ! कधी एखाद्या छोट्या गोष्टीतही उगाचच नन्नाचा पाढा लावायचा किंवा कधी एखादा मोठा निर्णयही विचार न करता घेऊन टाकायचा ! माझी कॉलेजमधली बारावीत जाणारी मुलगी व तिच्या तीन-चार मैत्रिणी १५ ऑगस्टला आलेल्या सुट्टीला जोडून लोणावळ्याला जायचा बेत करत होत्या. एका मैत्रिणीच्या मैत्रिणीचा तिकडे बंगला आहे - तिथे रहायची सोय होईल - वगैरे वगैरे - बेत सुरू होते. जिचा बंगला होता, ती मैत्रीण तर येणारच नव्हती. आजकाल १५ ऑगस्टला जोडून लोणावळ्याला इतकी बकाल गर्दी असते, की शहाण्या माणसांनी, कुटुंबांनी सुद्धा जाऊ नये. मुलींनी तर नाहीच नाही. पण मी नेमकी घरी नव्हते, तेव्हा लेकीने विचारले, आणि पेपर वाचता वाचता बाबांनी परवानगी देखील दिली. मग काय विरोध करणारी मीच. माझे आणि मुलीचे वादविवाद सुरू झाले. पण सुदैवाने ज्यांचा बंगला होता, तीच मंडळी बंगल्यावर जायची ठरल्याने आपोआपच प्रश्न सुटला, पण म्हणजे म्हणायची वेळ आलीच होती, 'तुमचं हे असंच आहे !'

सगळ्यात क्लायमॅक्स झाला तो आता माझ्या निवृत्तीच्या थोड्याच आधी व आत्तापर्यंत L.F.C. घेताना कायम मीच सर्व चौकशा-बुकींग वगैरे करायची. नोकरी सोडता सोडता शेवटचे एलएफसी घेताना ह्यांना म्हटले, 'या वेळेस तरी तुम्ही करा की सर्व !' तर म्हणाले, 'ठीक आहे. ठिकाण ठरवण्यापासून मीच करतो सर्व ! तुला आणि मुलांना सरप्राईज.' भाऊबीजेच्या रात्री निघायचे आहे, एवढेच आम्हांला सांगितले. मग पाडव्याच्या दिवशी सुखद धक्का दिला की मुंबईहून त्याच गाडीने येऊन माझा भाऊ, वहिनी, मुले पण आम्हाला जॉईन होतील. आम्ही एकदमच खुश झालो. रात्रीची जेवणे करून उशीराच स्टेशनवर गेलो. मुंबईहून १० च्या सुमारास निघणारी 'हुसेन सागर एक्सप्रेस येण्याची वाट पाहू लागलो. ती ठरल्या वेळेला रात्री १०.२० ला आली. भावाने आम्हांला हात वगैरेही केला. आम्ही तिकीटे घेऊन तयारच होतो, पण बघतो तर काय, आमच्या आरक्षित जागेवर लोक शांतपणे झोपलेले ! आम्ही तणतणत टी.सी.ला सर्व प्रकार सांगितला. टी.सी.ने आमची तिकिटे बघितली तर काय ? आमची गाडी त्या दिवशी पहाटे १.२० ला गेलेली होती. भावाची तिकिटे ज्या तारखेची काढली, त्याच्या पुढच्या तारखेची आमची तिकीटे काढायला हवी होती. रात्री १२ ला तारीख बदलली होती. मला तर क्षणभर निराशेने आणि रागाने रडावेसेच वाटायला लागले. ह्यांची चूक तर झालीच होती, पण मग मात्र ह्यांनी तात्काळ निर्णय घेऊन स्टेशनबाहेर येऊन हैद्राबादला जाणाऱ्या प्रायव्हेट व्होल्व्हो गाडीचे (बसचे) बुकींग केले व आमची वरात अचानकच ट्रेनऐवजी व्होल्व्हो बसने हैद्राबादला जाण्यास निघाली. या वेळेला मात्र मोठ्या उदार अंत:करणाने ह्यांनी मला खिडकीजवळची सीट पूर्ण १२ तासाच्या प्रवासात दिली व एकदा तरी 'मी बघून ठेवलयं, हे तुमचं नेहमीचंच आहे' - असे मी 'न' म्हणण्याची खबरदारी घेतली.

एकंदरीत काय, ही नवरे मंडळी अशीच !

'पदरी पडलं, पवित्र झालं, म्हणायचं नि सोडून द्यायचं !

**सौ.उर्मिला भालचंद्र गोरे,** पुणे.
दूरध्वनी - (०२०)२४२२७४०९

## बोध-निवृत्तीचा

बालपण, यौवन गेले दूर हरवून
चाहूल वृद्धत्वाची जाणवे मनोमन ॥१ ॥
संसाराच्या रगाड्यात मित्र परिवारात ।
दिसं कसे संपले, सारेच स्वप्नवत् ॥२ ॥
थकणे, देणे, घेणे आणिक भरविणे
कोडकौतुक करीता रागरूसवे काढणे ॥३ ॥
भांडणे, अहंकारणे, कर्तृत्व बुद्धी जोपासणे
रागद्वेष माया मोहमयी जाळे व्यर्थ विणणे ॥४ ॥
कर्तृत्वे करितांना, जरी न भान उरतसे ।
काल बली योगे कर्तेपण सरतसे ॥५ ॥
मधेच क्षण एक ये, माझ्या पदनिवृत्तीचा
त्या निमित्ते लाभे वेळ, घेण्या बोध प्रवृत्तींचा ॥६ ॥
घरी, दारी आणि नात्या मित्रपरिवारात ।
हळू हळू लागे कळू, गरज माझी संपण्यात ॥७ ॥
गोड कटू अनुभव जे जे अनुभवले ।
माया मोह आशापायी मीच स्वत:ला लुटविले ॥८ ॥
जीवनाच्या अंतिम चरणी, शांती मी शोधतसे ।
प्रवृत्तींच्या छाया मजसी दु:खरूपी वाटतसे ॥९ ॥
परामध्ये गुंतुनी, मी स्व-तत्त्व विसरलो ।
माया, आशारूपी जाळ्यात, माझेच मी गुंतलो ॥१० ॥
परामध्ये पराधीनता दु:ख सद्‌गुरू सांगती।
स्व-प्रतिष्ठेतच सद्‌सुख मिळे, न ही गोष्ट खोटी ॥११ ॥
म्हणूनी हे बंधुजन, घ्या वृत्ती आता तरी सांभाळून ।
प्रवृत्ती सकल दु:खमूळ, निवृत्ति शांत शरद चांदणं ॥१२ ॥

**- सुरेशचंद्र जैन,** औरंगाबाद

**आपण आपल्या वेबसाईटला भेट दिली आहे का ? नसल्यास जरूर भेट द्या.**

**Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004**
**SSPO Pune under Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date :13/05/2004**
**Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37 on 25th of each Month**

## ‘संवाद’ प्रतिक्रिया

आपला ‘संवाद’चा एप्रिल २००७ चा अंक मिळाला. श्री.पराडकर यांचा My Second Inning 'Not out' हा लेख वाचला. लेखकाने अंगीकारलेले कार्य केवळ अभिनंदनीय नसून अनुकरणीय आहे. त्यात त्यांनी उल्लेखिलेल्या मराठी विज्ञान परिषदेचा (M.V.P.) मुख्य हेतू (१) शास्त्राची प्रगती मराठी भाषेत व्हावी. (२) शास्त्र विषय मराठीत विशद करून मराठी भाषेस संपन्नता यावी इ. आहे. हे सर्व मराठी भाषे विषयीचे प्रेम इंग्रजी भाषेत व्यक्त न करता मराठीत केले असते तर अधिक बरे वाटले असते.

**- श्री.गोपाळ वि.मुळे,**
सावेडी, अहमदनगर

*******

आपला ‘संवाद’ चा दर महिन्याचा अंक नेहमी वाचतो. अंक छोटा असला तरी मनोरंजक व बोधपर असाच असतो. अंक हातात पडल्यावर पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेववतच नाही.

**- सौ.स्नेहल तऱ्हाळकर,**
अकोला

*******

‘संवाद’ चा एप्रिल २००७ चा अंक मला मिळाला व तो खूपच आवडला. ‘व्यक्तिविशेष’ या सदरात आपण माझ्याबद्दल परिचयात्मक लेख लिहून माझी कविता प्रसिद्ध केलीत त्याबद्दल धन्यवाद. आपण ‘संवाद’ च्या माध्यमातून माझ्या काव्यमय प्रवासात साथ संगत देऊन माझा एकप्रकारे गौरव केलात व माझ्या अंगी असलेल्या कलागुणांना दाद दिलीत त्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार. तसेच श्री.वसंत धुपकर यांनी मोजक्याच शब्दांत खूपच कांही माझ्याबद्दल लिहून आपली संपादन कुशलता दाखविली त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

**- श्री. सुधाकर कुळकर्णी,**
कोंबा, मडगांव (गोवा)

*******

‘संवाद’ एप्रिल २००७ मधील श्री.क्रांतिसेन आठवले यांचा ‘भारतीय स्वातंत्र्य समरा’ वरील लेख केवळ समयोचितच नव्हे तर अप्रतिम वठला आहे. १० मे २००७ रोजी या स्वातंत्र्य युद्धाला दीडशे वर्ष होत आहेत. केवळ दोनच पानात या अवघ्या स्वातंत्र्य युद्धाचं ‘पुनर्दर्शन’ घडवणं ही आठवले यांच्या लेखन कौशल्याची कमाल म्हणावी लागेल. त्यांच्या भाषेत तेज आहे, ओज आहे. आपल्या इतिहासाचे प्रेम आहे. अभिमान आहे. असा तेजस्वी लेख देणाऱ्या श्री.क्रांतिसेन आठवले यांना मनापासून धन्यवाद.

**मधु पोतदार, पुणे**

**सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वतः पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा ‘संवाद’ चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.**
**२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.**

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune - 411030. Ph:24332141**

To,

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, वसंत महाजन, क्रांतिसेन आठवले
**मुद्रक :** संविज्ञान इन्फोटेक प्रा. लि., ४९/७६३ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे ३०. फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ३२५४११५९